**नियमीत दिवाणी दावा क्र. ४/२०२०**
**दत्तात्रेय वि. नारायण**

## निशाणी क्र. २६ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने अतिरीक्त मुद्दा निश्चीत करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, कैफियतीच्या परिच्छेद ८ मध्ये प्रतिवादीने वादीकडून उसनवार घेतलेल्या पैशाची परतफेड केल्योच स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीकडून घेतलेल्या उसनवार पैशाची परतफेड केल्याचे सिध्द करतात का हा मुद्दा निश्चीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल करुन निशाणी क्र. २३ कडील क्रमांक २ च्या मुद्दयामध्येच वादीद्वारे निश्चीत करु इच्छिलेल्या मुद्दयाचा समावेश होत असल्याने त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एम. जे. तांबडकर आणि प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र आणि कैफियत यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने वादपत्रामध्ये प्रतिवादीद्वारे उसनवार रक्कम रुपये ४,००,०००/– ची परतफेड झाली नसल्याचे कथन केले आहे. निशाणी क्र. २३ कडे निश्चीत करण्यात आलेल्या मुद्दा क्र. २ मध्ये जरी प्रतिवादीने सदर रक्कम परतफेड केली का या मुद्दयाचाही समावेश होत असला तरी सदर मुद्दा सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर ठेवण्यात आली आहे. परंतू, वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथन आणि निश्चीत करण्यात आलेले इतर मुद्दयांच्या आधारावर मुद्दा क्र. २ मध्ये दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्या अनुषंगाने मुद्दे पुर्ननिश्चीत करणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. येणे मुद्दे पुर्ननिश्चीत करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

मुरुड (सं. गं. सरोदे)

दिनांकः २३/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुरुड